१३६९

जा.क्र. ना.बँका/डी ४/एन.पी.ए./निकष/२०११
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक :- ५ /२/२०११

**// परिपत्रक //**

**विषय :- अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.)कालावधी तिमाही ऐवजी सहामाही करणेबाबत**

संदर्भ :- सहकार आयुक्त व निबंधक कार्यालयाने शासन मान्यतेने काढलेली दि.१०.११.२००४ व दि.२१.१२.२००४ ची परिपत्रके

नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना सहकार विभागाच्या मान्यतेने दि.१०.११.२००४ च्या सहकार आयुक्त व निबंधक यांच्या परिपत्रकानुसार अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) निकष लागू करण्यात आलेले आहेत. सदरचे निकष हे केवळ कर्जासाठी लागू नसून सर्व प्रकारच्या जिंदगींसाठी लागू आहेत.

**सहकार आयुक्त व निबंधक यांच्या दि. २१.७.२००८ च्या परिपत्रकाप्रमाणे अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) निकष आर्थिक वर्ष २०१० -११ पासून अनुत्पादक जिंदगी ठरविण्याचा थकित कालावधी तिमाही करण्यात आलेला आहे. दिनांक २१.७.२००८ चे सदर परिपत्रक रद्द करण्यात येत आहे आणि आर्थिक वर्ष २०१०-२०११ पासून सदर अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) ठरविण्याचा थकित कालावधी तिमाही ऐवजी सहामाही करण्यात येत आहे.**

त्याचबरोबर अनुत्पादक जिंदगी निकष ठरविण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे कार्यालयाने दिनांक १२.१.२००५ ,९.५.२००५, १२.६.२००६ व २०.२.२००७ रोजी परिपत्रके काढलेली आहेत; ती सुध्दा या परिपत्रकानुसार रद्द करण्यात येत आहेत.

सहकार विभागाच्या मान्यतेने सहकार आयुक्त व निबंधक यांनी दिनांक १०.११.२००४ आणि दि.२१.१२.२००४ च्या परिपत्रकानुसार अनुत्पादक जिंदगी , वर्गीकरण, उत्पन्न निश्चितीचे धोरण आणि तरतुदी याबाबत देण्यात आलेली माहिती आणि निकष लागू रहातील.

सोनेतारण कर्ज, मुदतठेव तारण कर्ज आणि एन.एस.सी. , इंदिरा विकास पत्र , एल.आय.सी. इ. प्रमाणपत्रावरील दिलेली कर्जे ही संपूर्णतः सुरक्षित असून कर्जवसुलीबाबत कोणतीही कायदेशीर अडचण येत नसल्याने याप्रकारच्या कर्जांना आणि रु.१०,०००/- च्या आतील कर्जांना अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) निकषामधून वगळण्यात येत आहे.

सदर बदल आर्थिक वर्ष २०१०-११ पासून लागू करण्यात येत आहेत आणि नागरी /ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या संचालक मंडळ /अधिकारी /अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षक /निबंधक यांनी याबाबत नोंद घ्यावी.

सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत-

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३. तालुका उप / सहायक निबंधक सहकारी संस्था (सर्व)
४. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन.
५. जिल्हा पतसंस्था फेडरेशन.

R|20/4/2011

(१५)

# ई-प्रकाश

**(दि.१५/०४/२०११ रोजी केलेला Email नजरचुकीने पाठविण्यात आलेला आहे. दुरुस्त व Final Copy ही आज दि.१८/०४/२०११ रोजी केलेला Email समजण्यात यावा)**


**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**

**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१**

कार्यालय :०२०-२६१२२५००, ०२०-२६१२९५७२, ०२०-२६१२७२१७

फॅक्स : (०२०) २६१३३०८२

E-Mail : comm_audit@rediffmail.com    website-www.mhcooperative.org


~~जा.क्र.सआ/अंनिलेप/वाटप व्यवस्था/सुधा.परि./ ३५८/११~~

दिनांक :- ११ एप्रिल, २०११

## परिपत्रक

**विषय :- सहकारी संस्थाचे वैधानिक लेखापरीक्षणासाठी करावयाची सुधारीत वाटप व्यवस्था व उपाय योजनेबाबत...**

**संदर्भ :-** १. जा.क्र.सआ/ले.प./ना.बँका/पत/परिपत्रक/४७७/२००७ दि.१३ ऑगस्ट, २००७
२. जा.क्र.सआ/ले.प./लेखापरीक्षण व्यवस्था /२९१/२००८ दि.१५एप्रिल, २००८
३. जा.क्र. अर्थ/मुद/कोजिमस/रिपी३१७/२०११/११ दि.०९फेब्रुवारी, २०११
४. जा.क्र.सआ/अनिलेप/ना.बँका/ दि.११ एप्रिल, २०११

**प्रस्तावना**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१) मध्ये राज्यातील सर्व सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षणाची तरतूद आहे. सदर कलम ८१ (१) (अ) मधील संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षणाची जबाबदारी निबंधकांवर आहे. तसेच कलम ८१ (१) (ब) मधील संस्थांची तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.४९००/१९९५ मध्ये दि.०९/०२/१९९६ रोजी दिलेल्या आदेशास अधिन राहून कलम ८१ (१) (ब) खालील परंतुकान्वये कारणमिमांसा नमूद करुन अशा सर्व, संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण करुन घेण्याची जबाबदारी निबंधकावर आहे आणि कलम ८१ (१) (ब) मधील संस्थांचे लेखापरीक्षण संबंधीत संस्थांनी निबंधकाचे अधिसुचीत नामतालिकेवैरील प्रमाणित लेखापरीक्षक अथवा I.C.A.I. या संस्थेने दिलेले सहकार लेखापरीक्षण प्रमाणपत्र धारक सनदी लेखापालाकडून स्वतः करुन घ्यावयाचे आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात दि.२९/१०/२००७ रोजी सुधारणा करण्यात आल्यानूसार राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे वैधानिक लेखापरीक्षण राष्ट्रीय बँकेने मान्यता दिलेल्या सनदी लेखापालांकडून करावयाचे आहे तर प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण हे निबंधकाने अधिसुचित नामतालिकेवरील प्रमाणित लेखापरीक्षकाकडून किंवा I.C.A.I. ने दिलेले सहकारी संस्था लेखापरीक्षा प्रमाणपत्र धारक सनदी लेखापालाकडून करण्यात येणार आहे. तद्वतच, मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.१२०६/१९९७ मध्ये दि.०६/१०/२०१० रोजी नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्थांचे संदर्भातील शासन अधिसुचना दि.११/११/१९९६ स प्रशासकीय परिपत्रक गृहीत धरुन वैधतेबाबत निर्णय दिलेला असल्याने सदर दोन्ही संस्थांचे लेखापरीक्षणदेखील संबंधीत संस्थांनी कलम ८१ (१) (ब) तरतूदीनूसार स्वतः करुन घ्यावयाचे आहे. त्यामुळे संदर्भाधीन दि.१३/०८/२००७, दि.१५/०४/२००८ व दि.०९/०२/२०११ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकीय सुचनांसंदर्भात बदल करुन खालीलप्रमाणे अंशतः सुधारित सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) संदर्भीय दि.०९/०२/२०११ च्या परिपत्रकानूसार अधिनियमातील बदलामुळे प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांचे वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये समावेश करु नये.

२) वरीलप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांचे वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये समावेश करु नये.

३) नागरी सहकारी बँकांचे वैधानिक लेखापरीक्षणाबाबत सविस्तरपणे स्वतंत्र परिपत्रक संदर्भ क्र.४ नूसार दि.११/०४/२०११ रोजी निर्गमित केले असून त्यानूसार महाराष्ट्रातील सर्व नागरी सहकारी बँकांचे (अवसायनांतील बँका वगळून) वाटप सनदी लेखापालांना करावयाचे आहे त्यामुळे नागरी सहकारी बँकांचे लेखापरीक्षणासाठी शासकीय लेखापरीक्षकांचे वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये समावेश करु नये. मात्र अवसायनातील बँकांच्या लेखापरीक्षण कार्यक्रमात समावेश करावा.

४) संदर्भीय दि.०९/०२/२०११ च्या परिपत्रकातील सूचना क्र.५ प्रमाणे एका प्रमाणित लेखापरीक्षक/सनदी लेखापालाने जास्तीत जास्त ६ प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे ठरावान्वये लेखापरीक्षण स्विकारायचे आहे. त्याचप्रमाणे जास्तीत जास्त ४ नागरी पतसंस्था व पगारदार पतसंस्थांचे अशा एकूण १० संस्थांचे ठरावाद्वारे लेखापरीक्षण स्विकारायचे आहे. याबाबीत सदर परिपत्रकातील सुचनेप्रमाणे जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी दरमहा आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नूसार संस्थांनी ४५ दिवसांत म्हणजे १५ मे पर्यंत आर्थिक पत्रके तयार करुन पुढील १५ दिवसांत म्हणजे ३१ मे पर्यंत वैधानिक लेखापरीक्षणासाठी नियुक्त लेखापरीक्षकाकडे सादर करावयाचे आहेत त्यानूसार ज्या संस्था वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करुन

ठरावाची प्रत १५ दिवसांत म्हणजेच १५ जूनपर्यंत संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांचेकडे सादर करणार नाहीत अशा संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षणासाठी कलम ८१ (१) चे परंतुकाखाली आदेशान्वये जिल्हा उपनिबंधक यांनी विभागीय वाटप समितीच्या मंजूरीने ३० जूनपर्यंत फक्त खात्याच्या (शासकीय)लेखापरीक्षकाची नेमणूकीचे आदेश निर्ममित करावयाचे आहे.जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी जिल्यातील लेखापरीक्षक यांचे लेखापरीक्षण कार्यक्रम दि.१५/४/०८ मध्ये दिलेल्या प्राधान्यक्रमास अनुसरुन व उपरोक्त सूचना विचारात घेऊन तयार करावेत व विभागीय वाटप समितीची दि.३०/४/११ पुर्वी लेखापरीक्षण कार्यक्रमास मंजूरी घ्यावी.

५) जिल्हा उपनिबंधक यांनी कलम ८१ (१) (ब) खालील परंतुकान्वये संस्थांचे लेखापरीक्षण वाटप करतांना प्रत्येक लेखापरीक्षकास साधारणतः समान लेखापरीक्षण शुल्काच्या संस्थांचे वाटप आदेश दिले जातील याची दक्षता घ्यावयाची आहे.

**प्राथमिक कृषी विविध कार्यकारी सहकारी संस्था नागरी पत व सेवक पतसंस्थांचे संस्थांचे लेखापरीक्षणाबाबत**

प्राथमिक कृषी विविध कार्यकारी सहकारी संस्था नागरी पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्थानी वरील नियमाप्रमाधे दि.३१ मे पर्यंत वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करावयाची आहे व ठरावाची प्रत १५ जूनचे आत जिल्हा उपनिबंधकाकडे पाठविणे आवश्यक आहे . ज्या प्राथमिक कृषी विकास नागरी पत/पगारदार पतसंस्थांनी वरीलप्रमाणे लेखापरीक्षक नेमून दिनांक १५ जूनचे आत ठरावाची प्रत सादर केली नाही अशा संस्थांचे लेखापरीक्षणासाठी कलम ८१ (१) (ब) खालील परंतुकाखाली जिल्हाउपनिबंधक यांनी विभागीय वाटप समितीच्या मंजूरीने ३० जून च्या आत शासकीय लेखापरीक्षकांचे नेमणूक आदेश निर्गमित करावयाचे आहेत तसेच ज्या संस्थांनी खात्याच्या लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षणाची मागणी केली आहे अशा संस्थांचे बाबतीत जिल्हा उपनिबंधक यांनी कलम ८१(१) (ब) चे परंतुकाखाली शासकीय लेखापरीक्षकांचे नेमणूक आदेश निर्गमित करावेत.

स्टेट लेवल इम्प्लीमेंटेशन कमीटीच्या दिनांक ५/२/११ रोजीच्या सभेत झालेल्या निर्णयानुसार प्राथमिक कृषी पतसंस्थांचे लेखापरीक्षणासाठी खात्याचे लेखापरीक्षकाचाही निबंधकांने तयार केलेल्या लेखापरीक्षकांचे पॅनलमध्ये समावेश करावयाचा आहे. यासाठी जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी CAS चे प्रशिक्षण घेतलेल्या लेखापरीक्षकांची यादी जिल्हा उपनिबंधकांकडे सादर करायची आहे. प्राथमिक कृषी पतसंस्थांनी सहकार खात्याच्या/प्रमाणितं /सनदी लेखापाल यापैकी आपला वैधानिक लेखापरीक्षक नेमावयाचा आहे.

संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १५ ऑगस्टचे पूर्वी घेणे आवश्यक आहे व सभासदांना लेखापरीक्षण अहवाल ज्ञात होणेसाठी व संस्थेच्या कामकाजातील उणिवा व दोष सभासदांना कळणे आवश्यक असल्याने सदर अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेत ठेवणे आवश्यक आहे. तसेच काही लेखापरीक्षक स्वतःचे नावाने २० ते ३० संस्थांचे लेखापरीक्षणाचे ठराव प्राप्त करुन घेत आहे. त्यामुळे सदर संस्थांचे लेखापरीक्षण विहीत मुदतीत होऊ शकत नाही व संस्थांना लेखापरीक्षण अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवता येत नाही. त्यामुळे लेखापरीक्षण विहीत मुदतीत पूर्ण होण्यासाठी वरीलप्रमाणे १०

संस्थांचे बंधन घालण्यात आले आहे. तेव्हा एका लेखापरीक्षकाने वरीलप्रमाणे ६ प्राथमिक कृषी पतसंस्था व ४ नागरी पतसंस्था व पगारदार पतसंस्था अशा एकूण १० संस्थांचे लेखापरीक्षण पूर्ण करावयाचे आहे.

**इतर सुचना**

१. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, वर्ग - १ यांनी जिल्हयातील लेखापरीक्षकांकडून लेखापरीक्षण करवून घ्यावयाचे असलेने ते गुणवत्तापूर्ण व परिणामकारक होणेसाठी जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था, वर्ग- १ यांनी स्वत: लेखापरीक्षण कार्यक्रम कमाल तीन संस्थांचा घ्यावा. त्यांनी जिल्हयातील संस्थांचे लेखापरीक्षण परिणामकारक होणेसाठी कर्मचारीवृंदांना तिमाही ट्रेनिंग घेणे, मार्गदर्शन करणे, कार्यालयीन कामकाज करणे, वरिष्ठ कार्यालयांना आवश्यक माहिती सत्वर सादर करणे इ. कामे करावयाची आहेत.

२. लेखापरीक्षण अहवाल संस्थेस , जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, विभागीय सहनिबंधक (विभागीय स्थरीय असल्यास) सहायक निबंधक ( प्राथमिक कृषी सहकारी संस्था व तालुका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थाबाबत) व संस्था राज्यस्तरीय असलेस सहकार आयुक्त कार्यालय यांना ३१ जुलैपुर्वी सादर करावा. ३१ जुलैपुर्वी लेखापरीक्षण अहवाल सादर न झालेस त्या संस्थेचे ऑडीट झाले नाही असे गृहीत धरुन जिल्हा उपनिबंधक यांनी अशा संस्था शासकीय लेखापरीक्षकाकडे वाटप कराव्यात.

३. लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याशिवाय संस्था पूर्ण दाखवू नये.

४. एका संस्थेचे एकाच लेखापरीक्षकाकडे सलग दोनपेक्षा अधिका वेळा लेखापरीक्षण सोपविता येणार नाही.

५. संस्थेमध्ये अपहार गैरव्यवहार आढळल्यास विशेष अहवाल सादर करुन तात्काळ दोषी व्यक्तिंवर विहित कार्यपध्दतीने गुन्हे दाखल करावेत.

जिल्हा उपनिबंधक यांनी सदर परिपत्रक सर्व प्राथमिक कृषी पतसंस्थांचे नागरी पतसंस्था/पगारदार पतसंस्थांचे अथवा अनयिमितता त्याबाबत प्रशासकीय वा कायदेशीर कारवाईस्तव निदर्शनास आणून दयावे.

वरील सर्व सुचनांचे तंतोतंत पालन सर्व संबंधीतांनी करावे अन्यथा ते कारवाईस पात्र राहतील.

(राजगोपाल देवरा)
सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे